# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

**जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/२०२०** **दि. ०४ जानेवारी,२०२०**

जळगाव दि.४ ( ) वर्तमान युग हे तरुणांचे आहे. जगातील प्रत्येक क्षेत्राचे आणि चळवळीचे नेतृत्व तरुण करत असून त्या पार्श्वभुमीवर भारतातील तरुणांनी आपल्या मानसिकतेत बदल करण्याची गरज असून त्यासाठी चाकोरी बाहेरचा विचार करत प्रगतीशिल विचारांची कास धरणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन अमेरिकेतील सिटी बँकेचे माजी व्यवस्थापकीय संचालक आणि वस्तू व्युत्पन्न व्यापार प्रमुख श्री. सुनील देशमुख यांनी दीक्षांत समारंभात स्नातकांना उद्देशून केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा अठ्ठाविसावा दीक्षांत समारंभ शनिवार, दि.४ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सुनील देशमुख बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील होते.

देशमुख यांनी यावेळी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. अमेरिकेतील आपला प्रवास, करिअर या विषयी प्रारंभी माहिती देत त्यांनी अमेरिकेतील तरुण आणि भारतातील तरुण या मधील फरक ठळकपणे नोंदवला. वर्तमान हे तरुण पिढीचे आहे असे नमूद करतांना भविष्यातील गोष्टी वर्तमान काळाच्या मालकीच्या अधिन राहून तरुण पिढीने परिभाषित करायला हव्यात. सध्या साठ टक्के लोकसंख्या २५ वर्ष वयोगटाच्या आतील आहे. त्यामुळे जागातिक पातळीवर मोठी संधी तरुण पिढीला आहे. ज्ञान आणि सर्जनशिलतेवर आधारित अर्थव्यवस्थेत कोणतेही अडथळे नाहीत. अमेरिकेतील तरुणांनी हे जागतिक भान लक्षात घेतले. अनेक नव्या कल्पना आणि शोध त्यांनी बाजारात आणले. आज घडीला जगातील प्रत्येक क्षेत्रात २५ वर्षांच्या आतील तरुण नेतृत्व करीत आहेत असे सांगतांना त्यांनी पर्यावरणातील ग्रेटा, धर्मादाय क्षेत्रातील मार्क झुकेरबर्ग, शिक्षणक्षेत्रातील सलमान खान, सामाजिक क्षेत्रातील मलाला, तंत्रज्ञानातील इलॉन मस्क यांची उदाहरणे दिली.

अमेरिकेतील तरुणांची वैशिष्ट्ये सांगतांना सुनील देशमुख यांनी तेथील तरुण जिज्ञासु, साहसी, वंश व लिंग समानतेवर मजबूत विश्वास असणारा, अपयशाची भिती न बाळगणारा, पुरोगामी विचारसरणीचा, जागतिक दृष्टीकोन बाळगणारा आणि धार्मिकता नसलेला आहे असे सांगीतले. भारतातील तरुण हा जगातील इतरांइतकाच स्मार्ट असला तरी नवीन काही प्रयत्न करण्यास घाबरणारा, साहसापेक्षा सुरक्षिततेला प्राधान्य देणारा, जात मानणारा आणि लिंग समभावतेचा अभाव असणारा या सोबतच नेतृत्व करण्यापेक्षा अनुयायी होण्यात धन्यता माननारा आहे असे नमूद केले. आपल्याकडे पैसे नाहीत, तंत्रज्ञानाचा अभाव, संसाधने नाहीत, संधी नाही असे लंगडे समर्थन केले जाते.

भारतात गुणवत्ता असूनही गेल्या तीस वर्षात फक्त एकच शोध लागला अशी खंत त्यांनी व्यक्त केली. सुनील देशमुख म्हणाले की, संस्कृती हा धर्म नव्हे तर जीवन जगण्याची पध्दत आहे. जुनी आणि नवी संस्कृती या मधील संघर्ष आणि पक्षपात यामुळे आपण मागे राहतो. काही चुकीच्या कल्पना आपल्या मध्ये रुढ झाल्या आहेत. त्यामध्ये माणूसकीचा अभाव, अंधविश्वास, प्रस्थापित मानदंडांच्या अधिकारांवर प्रश्न उपस्थित करणे आणि लिंग समानतेचा अभाव या गोष्टी असल्याचे ते म्हणाले. पदवीधरांना सल्ला देतांना ते म्हणाले की, जागतिकस्तरावरचा विचार करीत स्थानिक पातळीवर काम करा, पारंपरिक विचारांच्या बाहेर जाऊन विचार करा निर्भय व्हा, अपयशाची भिती बाळगू नका, नाविन्यपूर्ण कल्पनांसाठी मनाची कवाडे उघडी ठेवा. व्यापक विचार करा, सत्तेपुढे सत्य बोला, पैसा म्हणजे अंतिम सत्य नव्हे त्यामुळे कामातून आनंद प्राप्त करा. सर्जनशील अर्थव्यवस्थेत महिला श्रेष्ठ आहेत हा लिंग समानतेचा विचार मनात रुजवा आणि प्राप्त झालेल्या पैशातून समाजाला काही परत देण्याची वृत्ती बाळगा. श्री. देशमुख यांनी पुरोगामी विचार सरणी तुम्हांला यशस्वी, आनंदी आणि उत्तम माणूस बनवेल असा आशावाद यावेळी व्यक्त केला.

प्र-कुलगुरु प्रा.पी.पी. माहूलीकर यांनी विद्यापीठाच्या गेल्या वर्षभरातील वाटचालीचा आढावा घेतांना विद्यापीठाचा सिलेज प्रकल्प, विद्यार्थी साहित्य संमेलन, नवीन सुरु करण्यात आलेले अभ्यासक्रम यांचा उल्लेख केला.

या कार्यक्रमात दीक्षांत मिरवणूकीने सभामंडपात अतिथींचे आगमन झाले. विद्यापीठाचा मानदंड घेऊन सहायक वित्त अधिकारी, राजेश नारायण सावळे मिरवणूकीच्या अग्रभागी होते. दीक्षांत मिरवणूकीत प्रमुख अतिथींसह अधिसभा सदस्य, व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिष्ठाता हे सहभागी होते. प्रारंभी विद्यापीठ गीताने सुरुवात झाली. प्रा.संजय पत्की व सहकाऱ्यांनी गीत सादर केले. त्यानंतर प्रभारी कुलसचिव प्रा.बी.व्ही.पवार यांनी कुलगुरुंकडे कार्यक्रम सुरु करण्याची परवानगी मागितली. विविध विद्याशाखांच्या अधिष्ठातांनी स्नातकांना पदवी प्रदान करण्यास्तव केलेल्या विनंतीनुसार स्नातकांना पदवी प्रदान केल्या. अधिष्ठातांमध्ये, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता, प्रा.ए.बी.चौधरी, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता, प्राचार्य पी.पी.छाजेड, मानव्य विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता, प्राचार्य डॉ.पी.एम.पवार, आणि आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे प्रभारी अधिष्ठाता, प्राचार्य डॉ. लता मोरे यांचा समावेश होता.

यावेळी गुणवत्ता यादीतील ९५ विद्यार्थ्यांना अतिथींच्या हस्ते सुवर्णपदके देण्यात आली. सुर्वण पदक प्राप्त विद्यार्थ्यांच्या यादीचे वाचन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन आशुतोष पाटील व प्रा.सुरेखा पालवे यांनी केले.

यावेळी मंचावर प्र-कुलगुरु, प्रा.पी.पी.माहूलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य, दिलीप पाटील, प्रा.ए.बी.चौधरी, प्रा.रत्नमाला बेंद्रे, प्राचार्य एल.पी.देशमुख, प्रा.नितीन बारी, प्रा.मोहन पावरा, डॉ.सुभाष चौधरी, दीपक बंडू पाटील, विवेक लोहार, प्रा.जे.बी.नाईक, डॉ.प्रिती अग्रवाल, प्रभारी कुलसचिव, प्रा.बी.व्ही.पवार, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी, विवेक काटदरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक, बी.पी.पाटील उपस्थित होते.

या दीक्षांत समारंभात ३८ हजार २८२ स्नातकांना पदव्या बहाल करण्यात आल्या. यामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे १६ हजार ३३९ स्नातक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे ६ हजार ५०३ स्नातक, मानव्य विद्याशाखेचे १४ हजार ३३३ आणि आंतर विद्याशाखेचे १हजार १०७ स्नातकांचा समावेश आहे. या शिवाय स्वायत्त असलेल्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे बी.टेक.चे ४५८ आणि एम.टेक. चे ०५ अशी एकूण ४६३ विद्यार्थ्यांना देखील पदवी बहाल करण्यात आल्या.

## क्षणचित्रे

१. **सुर्वणपदक प्राप्त विद्यार्थी आपल्या आई-वडीलांसमवेत मंचावर सुवर्णपदक घेण्यासाठी जात होते, तेव्हा सभागृहातून टाळयांचा प्रचंड प्रतिसाद मिळत होता.**

२. **सेल्फी पॉईंटजवळ विद्यार्थ्यांनी छायाचित्र काढण्यासाठी प्रचंड गर्दी केली होती.**

३. **यावेळी दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वाटपासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली होती.**

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२० दिनांक :-४ जानेवारी,२०२०

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी